तरुण भारत ◈ मंगळवार दि. ११ फेब्रुवारी २००३

# स्त्रियांनी सर्व क्षेत्रात खंबीरपणे पुढे आले पाहिजे – सौ. सपकाळ

## भद्रकाली ताराराणी पुरस्कार प्रदान



ताराराणी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा भद्रकाली ताराराणी पुरस्कार सौ. सिंधुताई सपकाळ यांना पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यप्रसंगी डावीकडून माणिक सपकाळ, रा. कृ. कणबरकर, प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील. (छाया– राजा उपळेकर)

**कोल्हापूर / प्रतिनिधी ■**

आजच्या स्थितीत जीवनात विविध टप्प्यांवर धोके आहेत. परंतु स्त्रियांनी न घाबरता, खंबीरपणे सर्व क्षेत्रात पुढे आले पाहिजे, असे आवाहन ज्येष्ठ समाजसेविका सौ. सिंधुताई सपकाळ यांनी केले. ताराराणी विद्यापीठातर्फे आयोजित भद्रकाली ताराराणी पुरस्कार वितरण समारंभात सत्कारास उत्तर देताना त्या बोलत होत्या.

डॉ. सपकाळ म्हणाल्या, पूर्वी अंगाई गीताच्या माध्यमातून बालपणातच देश घडविणारे संस्कार दिले जायचे. आज आम्ही संस्कार द्यायला विसरलो आहोत. आजच्या स्थितीमध्ये आई कमजोर असून चालणार नाही. ती सक्षम असली पाहिजे. महाराष्ट्रात मोठं होण्यासाठी मरावं लागतं हे महात्मा फुले, छत्रपती शाहू महाराज, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सावित्रीबाई फुले यांच्या त्यागातून दिसून येते. या सर्व महान विभुतींना जीवंतपणी खूप त्रास सोसावा लागला. आणि आता मृत्यूनंतर आपल्याला त्यांचे महत्त्व उमजले आहे.

मला भूतकाळ विसरायचा आहे असे सांगून सौ. सपकाळ पुढे म्हणाल्या, माझ्या नऊवारी साडीचं चीज झालं आहे, कारण सावित्रीबाई फुले, राजमाता जिजाबाई, अहिल्याबाई होळकर, छत्रपती ताराराणी, रमाबाई आंबेडकर यांच्या नऊवारी साडीप्रमाणे त्यांच्या विचारांची माझ्या हातून थोडीतरी जपणूक होते. मी पूर्णपणे शाकाहारी आहे. बकरी, कोंबडं बळी देण्याबरोबरच जीव घेण्याचा धंदा कधी केला नाही असे सांगून त्यांनी, कष्ट करा, घाम गाळा, जगा आणि जगू द्या असा संदेश दिला.

महाभारतात श्रीकृष्णाने द्रौपदीला साडी पुरविल्याचे वाचले आहे. पण तो श्रीकृष्ण काही पाहिला नाही. पण आधुनिक काळात अनाथ द्रौपदींना प्रत्येक वर्षी साड्या पुरविण्याचे काम डॉ. डी. वाय. पाटील यांनी केले आहे, असे सांगून सौ. सपकाळ यांनी डॉ. पाटील यांचे कौतुक केले. 'किसे अपना बनाऊ कोई काबील नही मिलता, पत्थर बहुत मिलते है लेकीन दिल नही मिलता, यह दिल कोल्हापूर में मिलता है।', असा शेर सादर करत त्यांनी कोल्हापूरचे कौतुक केले.

यावेळी बोलताना पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील म्हणाले, समाजात अनेक माणसं मोठं काम करतात. पण जीवंतपणी त्यांच्या कार्याची प्रचिती समाजास येत नाही. हे अनेकांच्या नशिबी आले आहे. अगदी छत्रपती शिवाजी महाराजही याला अपवाद नाहीत. आपल्या देशात अजूनही ९४ टक्के लोकांना शिक्षण मिळत नाही. दारिद्र्यरेषेखालील ४० टक्के लोकांनी तर शाळाच पाहिली नाही. ही स्थिती बदलली पाहिजे. म्हणूनच समाजात खंबीरपणाने उभे करणारे शिक्षण दिले पाहिजे. ग्रामीण भागात शिक्षण नेण्यासाठी शैक्षणिक कर्जाची सोय असावी यासाठी प्रत्येक बँकांनी विद्यार्थी निवडले पाहिजेत, असेही डॉ. पाटील यांनी यावेळी सांगितले.

ताराराणी विद्यापीठातर्फे देण्यात येणारा द्वैवार्षिक भद्रकाली ताराराणी पुरस्कार पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या हस्ते सौ. सिंधुताई सपकाळ यांना प्रदान करण्यात आला. शाल, श्रीफळ, २१ हजार रुपयांची थैली, गौरवपत्र आणि मानचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप आहे. कार्यक्रमास संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष रा. कृ. कणबरकर, सचिव प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, उपाध्यक्षा सौ. राजलक्ष्मी जाधव, श्री. पर्वते–पाटील, उत्तमराव काळे, बाबुराव धारवाडे, डॉ. सुनिलकुमार लवटे, चंद्रकांत बोंद्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वागत आणि प्रास्ताविक रा. कृ. कणबरकर यांनी केले. गौरवपत्राचे वाचन प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केले. सूत्रसंचालन सौ. जयश्री पाटील व अरुण कणगलेकर यांनी केले. प्रा. श्रीमती यु. डी. इंदूलकर यांनी आभार मानले.